आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,
बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे
मराठी विभाग

वार्षिक कामकाज अहवाल २०२५–२०२६

महाविद्यालयातील मराठी विभाग ऑगस्ट १९९३ मध्ये सुरू झालेला आहे.विभागामध्ये पदवी व पदव्युत्तर अशा दोन स्तरावरील विभाग कार्यरत आहे.त्यांची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे

अ.क्र.	वर्ग	मुले	मुली	एकुण
१.	द्वितीय वर्षकला	०२	१०	१२
२.	तृतीय वर्षकला	०३	०७	१०
३.	एम.ए.भाग १	०५	०१	०६
४.	एम.ए.भाग २	०३	०४	०७
			एकुण	३५

मराठी विभागाने राबविलेले उपक्रम खालीलप्रमाणे

१)विद्यार्थी सभा

मराठी विभागातील विद्यार्थ्यांची सभा दि. ०१/०७/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती.याप्रसंगी विभागप्रमुख प्रोफेसर प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विभागातील सहा.प्राध्यापक डॉ.पुरुषोत्तम काळे, पोपट माने,प्रा.तुषार गभाले इ.उपस्थित होते.

२)पावसाळी कविसंमेलन

दि.१८/०७/२०२५ रोजी मराठी विभागाने पावसाळी कविसंमेलनाचे आयोजन केले होते. विद्यार्थी व शिक्षक यांच्या सहभागाने कार्यक्रमाची रंगत वाढली.कवितांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी ०८ शिक्षक व १०० विद्यार्थी उपस्थित होते.

३)अभिजात मराठी भाषा सप्ताह

दि.०७/१०/२०२५ रोजी मराठी विभागाने अभिजात मराठी भाषा सप्ताह व कोजागीरी पौर्णिमे निमित्ताने कविसंमेलनाचे आयोजन केले होते. विद्यार्थी व शिक्षक यांच्या सहभागाने कार्यक्रमाची रंगत वाढली.कवितांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला.याप्रसंगी ०८ शिक्षक व ५० विद्यार्थी उपस्थित होते. अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने दि.०८/१०/२०२५ रोजी मराठी विभागाने व्याख्याान कार्यक्रमाचे आयोजन केले होते..याप्रसंगी प्रा.पोपट माने यांनी 'अभिजात मराठी भाषा' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी ०४ शिक्षक व ३० विद्यार्थी उपस्थित होते.

४)वाचन प्रेरणा दिन

दि.१५/१०/२०२५ रोजी मराठी विभागाने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन केले होते.याप्रसंगी विभागप्रमुख प्रोफेसर प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी 'वाचनाचे महत्त्व' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी ०३ शिक्षक व ३० विद्यार्थी उपस्थित होते.

५)व्याख्यान कार्यक्रम

दि.०९/०१/२०२६ रोजी मराठी विभागाने डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने व्याख्याान कार्यक्रमाचे आयोजन केले होते..याप्रसंगी डॉ.राजेश मिरगे यांनी 'डॉ.पंजाबराव देशमुख यांचे जीवनचरित्र' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी ०८ शिक्षक व ६० विद्यार्थी उपस्थित होते.

६)मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

मराठी विभागाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्ताने दि.१६/०१/२०२६ रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात वक्तृत्त्व, निबंधस्पर्धा, कविसंमेलन, माहितीपट दाखविणे, मुक्तसंवाद, घोडेगाव येथील हिराबाई काळे यांच्या मायबोली साहित्य सांस्कृतिक ग्रंथालयास भेट, मराठी वाचन कट्टा चॅनलचे उदघाटन इ. विविध कार्यक्रम संपन्न झाले. याप्रसंगी १०शिक्षक व ६० विद्यार्थी उपस्थित होते.

७)मराठी भाषा गौरव दिन

मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी मराठीत स्वाक्षरी करण्याचे आवाहन करण्यात आले होते.या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

८) नेट परीक्षेत मराठी विभागातील विद्यार्थ्यांचे यश

यावर्षी घेण्यात आलेल्या राज्य आणि राष्ट्रीय प्राध्यापक पात्रता परीक्षेत मराठी विभागामध्ये पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले खालील विद्यार्थ्यांनी सेट, नेट परीक्षेत यश प्राप्त केले आहे. संस्था, महाविद्यालय, मराठी विभाग व शिक्षकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

१	श्री.आंबवणे बाबुराव सखाराम	नेट, जाने २०२६

विभागाचे कामकाज करताना संस्थाचालक,सहकारी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व सेवक, विभागाचे विद्यार्थी इ.सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळे विभाग लौकिकास पात्र ठरला आहे.

आपला विश्वासू

प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर

(मराठी विभागप्रमुख)